REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ हि धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख १ सप्टेंबर, १९४८ अंक ३५


## दि न्यू सिटिझन बँक
### ऑफ इंडिया, लि.

हेड ऑफिस : १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

एकूण खेळतें भांडवल : ३,५०,००,००० रु. वर
वसूल भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड : १२,००,०००रु.वर

★ बँक स्ट्रीटवर ★

३,१७,००० रुपयांची बँकेची स्वतःची इमारत

**स्थानिक शाखा :** १ दादर, २ गिरगांव, ३ मेंटरोड, ४ जव्हेरी बाजार, ५ माटुंगा, ६ शींव, ७ विलेपार्ले.

**इतर शाखा :** ८ अहमदाबाद, ९ अहमदनगर, १० अकोला, ११ अमरावती, १२ बडनेरा, १३ बेळगांव, १४ चांदा, १५ कडाक टाऊन ( सी. पी. ), १६ दिल्ली, १७ देवळाली, १८ धुळें, १९ गुरगांव ( पंजाब ), २० इचलकरंजी, २१ जळगांव, २२ कारंजा, २३ कोल्हापूर, २४ कोपरगांव, २५ लोणंद, २६ महाड, २७ मालेगांव, २८ मिरज, २९ मूर्तिजापूर, ३० नागपूर शहर, ३१ नंदुरबार, ३२ नाशिक शहर, ३३ नाशिक रोड, ३४ पंढरपूर, ३५ पहाडगंज, ३६ पेण, ३७ पुणें शहर, ३८ पिंपळगांव, ३९ संगमनेर, ४० सांगली, ४१ शाहूपुरी, ४२ सिन्नर, ४३ सिताबर्डी, ४४ यवतमाळ, ४५ शिवाजी नगर ( पुणें ), ४६ शहापूर ( बेळगांव ) ४७ नामपूर ( नाशिक ).

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

मागीदारांची संख्या २,२०० वर. ठेवीदारांची संख्या ५०,००० वर.

डी. एन. गांडेकर,
बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजर, पुणें शाखा.
( बुधवार चौक )

डी. डी. देशपांडे, बी. ए.
मॅनेजिंग डायरेक्टर.

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

फोन नं. ४८२ | तारेचा पत्ता " Cencobank " | पोस्टबॉक्स नं. ५११

मुख्य कचेरीः–लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें






# आगाऊ तरतूद करा

आपल्या शेतीवरील पुढें होणारी पाणीपुरवठ्याची अडचण दूर करण्यासाठी आतांच पंप व एंजिन्सची ऑर्डर द्या.

— चौकशी करा —

केळकर बंधु, बुधवार चौक पुणें २.


## विविध माहिती

**पाकिस्तानसाठी यंत्रसामुग्री**—मोठाल्या कारखान्यांचीं यंत्रें व छपाईचीं यंत्रें मिळविण्यासाठीं पाकिस्तान सरकारचें एक व्यापारी शिष्टमंडळ ओटावा येथें गेलें आहे. पॅलेस्टाइनमधील ज्यू राज्याचेंहि एक व्यापारी मंडळ ओटावाला गेलें आहे. कॅनडाशीं दीर्घ मुदतीचे व्यापारी करार करण्याचा ह्या शिष्टमंडळांचा प्रयत्न राहील. दरवर्षी २ कोटी डॉलर्सचा व्यापार कॅनडाशीं करतां येईल, असा पाकिस्तानी शिष्टमंडळाचा अंदाज आहे.

**सरहद्द प्रांताला कर्ज**—पाकिस्तान सरकारनें सरहद्द प्रांतिक सरकारला निरनिराळ्या योजनांसाठी मिळून ५२ लाख रुपये कर्ज देण्याचें कबूल केलें आहे, असें समजतें. ह्या रकमेपैकीं तीन चतुर्थांश रक्कम मलाकंद येथील वीज उत्पन्न करण्याच्या धरणावर खर्च करण्यांत येणार आहे.

**कर्नाटकसाठी रेडिओचें केंद्र**—हिंदी सरकारच्या माहिती खात्यातर्फे कर्नाटक चेंबर ऑफ कॉमर्सच्या चिटणिसाला गेलेल्या पत्रावरून असें समजतें, कीं पुढील वर्षी धारवाड येथें कर्नाटकसाठी स्वतंत्र रेडिओचें केंद्र उघडण्यांत येणार आहे.

**शेतकी खात्याची कामगिरी**— मुंबई प्रांतांतील बऱ्याच भागांतील भाताच्या व ज्वारीच्या पिकांना कीड लागण्याची भीति उत्पन्न झाली होती. परंतु सरकारच्या शेतकी खात्यानें कांहीं उपाय करून पिकांचें किडीपासून रक्षण करण्यांत यश मिळविलें. ह्या उपायांमुळें बेळगांव, धारवाड आणि विजापूर जिल्ह्यांतील ७० हजार एकरांतील पिकांचें संरक्षण झालें, असें समजतें.

**जागतिक बँकेची बैठक**—आंतरराष्ट्रीय बँक व मॉनेटरी फंड ह्या संस्थेची बैठक वॉशिंग्टनला २७ सप्टेंबर रोजीं भरणार आहे. हिंदुस्थानच्या रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर सर चिंतामण देशमुख हे हिंदी प्रतिनिधि म्हणून ह्या बैठकीला हजर रहाणार आहेत, असें समजतें.

**रस्ते करण्याचे रूळ**—रस्ते तयार करण्याच्या अवजड यांत्रिक रुळांचा धंदा हिंदुस्थानांत स्थापन करण्याचें हिंद सरकारनें ठरविलें आहे. सध्या टाटा कंपनीला ९५० वाफेचे रूळ देण्याचें गेन्सबरो येथील मार्शल अँड सन्स कंपनीनें कबूल केलें आहे. हा करार पुरा झाल्यावर टाटा कंपनीनें हे रूळ तयार करण्याचें काम अंगावर घ्यावें, ह्या गोष्टीला सरकारनें मान्यता दिली आहे. हिंदुस्थानला दरवर्षी कमीत कमी ३५० रूळ लागतात. हिंदुस्थानांत रूळ तयार होऊं लागले तर त्यांना ब्रह्मदेश, सीलोन, पाकिस्तान, मलाया, इत्यादि देशांतून बाजारपेठ मिळण्यासारखी आहे.

**जपानसाठी तेल**—युद्ध संपल्यानंतर सिंगापूरला नुकतीच पहिली जपानी बोट गेली. याकोहामापासून ९ दिवस न थांबता प्रवास करून तिनें सिंगापूर गांठलें. ही १० हजार टनांची बोट इराणच्या आखातांतील बेहरिन बेटांत जाऊन तेथून १४,००० टन तेल जपानला नेणार आहे.

**हाडांची निर्यात**—हाडांना सध्या परदेशांत चांगली किंमत व मागणी असल्यामुळें त्यांची निर्यात करणें हिंदुस्थानच्या हिताचें आहे, अशी माहिती हिंदुस्थानच्या अन्नमंत्र्यांनीं दिली आहे. ह्या निर्यातीमुळें हिंदुस्थानला परदेशी हुंडणावळीचाही लाभ होतो. १९४६–४७ सालीं एकूण ४५,३०८ टन हाडें परदेशीं धाडण्यांत आलीं. रॉकफॉस्फेटचा एक टन आयात करण्याला १०० रुपये पडतात. उलट, हाडांच्या १ टन निर्यातीला ३५० रुपये किंमत येते.

**बिहारमधील जंगलें**—खाजगी मालकीच्या जंगलांचा नाश टाळण्यासाठी बिहार सरकारनें अशीं सर्व जंगलें आपल्या ताब्यांत घेतलीं आहेत. खाजगी मालकीचीं जंगलें ताब्यांत घेण्याच्या बाबतींत कोणी अडथळे आणले तर सरकार त्यांना न जुमानतां आपली योजना अंमलांत आणील, असें सरकारी पत्रकांत मुद्दाम जाहीर करण्यांत आलें आहे.

**पाकिस्तानचें राष्ट्रीय वाचनालय**—पाकिस्तान सरकार कराची येथें लवकरच एक आधुनिक वाचनालय स्थापन करणार आहे. वाचनालयाची तपशिलवार योजना ठरविण्यासाठी चार तज्ज्ञांची एक कमिटी नेमण्यांत आली आहे. ह्या वाचनालयांत सर्व राष्ट्रांच्या वाङ्मयाचीं पुस्तकें ठेवण्यांत येणार आहेत. संस्कृत साहित्याचाही वाचनालयांतील पुस्तकांत समावेश करण्यांत आला आहे. वाचनालयासाठी प्राथमिक खर्च सुमारें पांच लाख रुपये येईल.


## पुणें सेंट्रल को आपरेटिव्ह बँक लिमिटेड पुणें शहर

# नोटीस

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडची ३१ वी वार्षिक साधारण सभा रविवार तारीख १२ सप्टेंबर सन १९४८ रोजीं सायंकाळीं ५–३० वाजतां पुणें येथें नूतन मराठी विद्यालयाचे असेंब्ली हॉलमध्यें भरेल. या सभेंत सन १९४७–४८ सालचा बँकेचा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफावांटणी मंजूर करणें, हिशेब तपासनीसांच्या तपासणी यादीचा विचार करणें, पोट नियम नं. ५–५९–६२ (ब) व ६५ (७) यांतील दुरुस्त्या मंजूर करणें, पुढील सालासाठी डायरेक्टर्स, चेअरमन, व्हाईस चेअरमन निवडणें, हिशेब तपासनीस नेमणें व त्याचे वेतन ठरविणें, बोर्डानें सेव्हिंग्ज बँकेचे नियम नं. ९ व नोकरी संबंधींचे नियम नं. २३–२६ व ६४ (अ) मध्यें केलेल्या दुरुस्त्यांची माहिती घेणें व सालाबादप्रमाणें इतर मामुली विषयांचा विचार करणें वगैरे कामें होतील. डायरेक्टरांची व हिशेब तपासनीसांची निवडणूक त्याच दिवशीं व त्याच इमारतींत सकाळीं ८–३० ते दुपारीं १२ वाजेपर्यंत होईल. तरी सदर निवडणुकीस व सभेस बँकेच्या सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंति आहे.

बोर्डाच्या हुकुमावरून

द. दि. चितळे

तारीख २७–८–१९४८ म्यानेजिंग डायरेक्टर

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—

# खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, डमढेरे बोळाजवळ, पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. १ सप्टेंबर १९४८





प्रो. वा. गो. काळे


संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## चलनविस्तार व उत्पादनांत घट, ह्याऐवजीं चलनसंकोचन व उत्पादनवाढ पाहिजे

हिंदुस्थानांतील चलनवाढीचा प्रश्न सोडवितांना येणारी मुख्य अडचण उत्पादन कमी होत चाललें आहे, ही होय. युद्धकाळांतील चलनविस्ताराइतकी तेव्हांची उत्पादनवाढ झाली नाहीं, तरी उत्पादन शक्य तेवढें ज्यास्त होत राहिलें, ही गोष्ट खरी. परंतु, युद्धसमाप्तीनंतर उत्पादन घटूं लागलें आणि ही घसरगुंडी अद्याप थांबलेली नाहीं. १९४६ सालीं औद्योगिक वांध्यांमुळें कामाचे १ कोटी, २० लक्ष दिवस वाया गेले; १९४७ मध्यें हा आंकडा १ कोटी, ७० लक्ष दिवसांवर गेला. पंजाब नॅशनल बँक लि. चे चेअरमन व जनरल मॅनेजर श्री. योधराज, ह्यांनीं ह्या संबंधांत दिलेले आकडे उद्बोधक आहेत. वाया गेलेल्या कामाच्या दिवसांमुळें उत्पादन ११% घटलें; मजुरी वाढल्यामुळें गैरहजेरीचें प्रमाणहि वाढून कांहीं महत्त्वाच्या उद्योगधंद्यांचें उत्पादन आणखी १०% नें घटलें. घटींत भर घालणारीं आणखीहि अनेक कारणें होतींच. खालील तक्त्यांत हिंदुस्थानांतील औद्योगिक उत्पादनासंबंधीं तुलनात्मक आकडे दिले आहेत.

### हिंदुस्थानांतील औद्योगिक उत्पादनांत घट

| | १९४५–४६ | १९४६–४७ | घटीचें प्रमाण% |
|---|---|---|---|
| कपास–कापड (कोटी वार) | ४६५ | ३८६ | १७ |
| कपास–सूत (कोटी पौंड) | ५५ | ४७ | १४ |
| कागद (हजार हं. वे.) | १,६८१ | १,२४४ | २६ |
| साखर (हजार हं. वे.) | १०,२३० | ८,६६६ | १५ |
| आगपेट्या (कोटी ग्रोस) | २०२ | १२४ | ३९ |
| सिमेंट (हजार टन) | २१४६ | २०१६ | ६ |
| पिग आयर्न (हजार टन) | १४२२ | १३६५ | ४ |
| पोलाद इनगॉट (हजार टन) | १२९९ | ११९९ | ८ |
| तयार पोलाद (हजार टन) | १३३८ | ११६० | २१ |
| उत्पादनांतील | सरासरी | घट = १६% | |

फाजील चलनविस्ताराची दुसरी बाजू चलनी नोटांतील वाढीची होय. जून,१९४६ ते डिसेंबर १९४७ पर्यंत एकूण चलनी नोटांची संख्या साधारणपणें कायम राहिली. परंतु, सप्टेंबर,१९४७ पासून खेळत्या नोटा वाढूं लागल्या. फेब्रुवारी,१९४८ पर्यंत नवीन नोटा न काढतां रिझर्व्ह बँकेच्या बँकिंग खात्यांतील नोटांच्यावर काम भागविण्यांत आलें. ह्यानंतर मात्र सरकारी रोख्यांचे तारणावर नव्या नोटा काढून त्या प्रसृत करण्यांत येऊं लागल्या. १९४८ च्या पहिल्या सहामाहींत, काढलेल्या नोटांच्या संख्येंत ८० कोटींची व सप्टेंबर, १९४७ च्या मानानें प्रसृत नोटांत १४० कोटींची भर पडली आहे. "ही वाढ इकडे होत असतांना, उत्पादन तिसऱ्या हिश्यानें कमी झालें आहे व परराष्ट्रीय व्यापार पूर्वींच्या मानानें निम्म्यावर आला आहे."

## फाजील चलनविस्तारावर चीनची उपाययोजना

चीनमध्यें नोटांचा भयंकर सुळसुळाट होऊन तेथील आर्थिक जीवन कसें अवघड होऊन गेलें ह्याची सर्वांस माहिती आहेच. ह्या परिस्थितीवर तेथील सरकारनें धाडसीपणानें उपाययोजना करण्याचें योजिलें आहे. हिंदुस्थानांतील परिस्थिति चीनमधील परिस्थितीइतकी बिकट नसली, तरी तिची प्रवृत्ति त्याच स्वरूपाची होता कामा नये आणि वेळींच उपाय करणें अगत्याचें आहे. प्रमुख हिंदी अर्थशास्त्रज्ञांचा सल्ला घेण्यांत हिंदुस्थान सरकारनें जागरूकपणा दाखविला आहे, ह्यांत संशय नाहीं. अर्थशास्त्रज्ञांनीं एकमतानें केलेल्या सूचनांचा सरकार अर्थातच काळजीपूर्वक विचार करील, हें उघडच आहे. त्यांच्या सूचना अंमलांत न आणण्यास सयुक्तिक कारणें देण्याची जबाबदारी सरकारवर पडणार आहे. चीननें अशाच संबंधांत केलेल्या उपाय-योजनेची माहिती येथें उद्बोधक होईल.

चीननें सध्याच्या कायदेशीर चलनाच्या जागीं सोन्यावर आधारलेल्या येनची स्थापना केली आहे. ह्या नव्या चलनास लागणाऱ्या पाठिंब्यापैकीं ४०% पाठिंबा देण्याइतकें सोनें चिनी सरकारजवळ बहुधा असेल. हें नवें चलन सुरू झालें, म्हणजे जुनें चलन व्यवहारांतून काढून घेण्यांत येईल. नवा सोन्याचा येन= ०·२२२१७ ग्रॅम सोनें, असें ठरविण्यांत आलें आहे. १० सेंट म्हणजे १ डाइम, व १० डाइम म्हणजे १ येन, असें चलनाचें कोष्टक राहील. चलनाबाबत सुधारणेच्या योजनांत पुढील महत्त्वाच्या बाबी आहेत. राष्ट्रीय उत्पन्न व खर्च ह्यांची तोंडमिळवणी करण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यासाठी करआकारणीची योजना सुधारावी लागेल व सरकारी मालकीचे उद्योगधंदे आंतबट्याचे होणार नाहींत ह्या दृष्टीनें आखावे लागतील. परदेशांचें देणें भागविण्यासाठी निर्गत वाढविण्याचे प्रयत्न करण्यांत येतील आणि त्याबरोबरच आयात मालाचा उपयोग शक्य तेवढ्या काटकसरीनें करावा लागेल. परदेशी हुंडणावळीची बचत त्यामुळें होऊं शकेल. किंमती स्थिर करून त्यांचें नियंत्रण, ह्याहि गोष्टी क्रमप्राप्तच आहेत. कारखाने बंद पाडणारे संप बेकायदा केले जातील. अपुऱ्या भांडवलाच्या बँकांचे व्यवहार चालू ठेवले जाणार नाहींत. अर्थात्, ह्या सर्व उपायांची अंमलबजावणी किती कार्यक्षमतेनें होईल ह्यावरच त्यांचें यश अवलंबून राहील सरकारी कार्यांस अधिकारी वर्गाचा व हितसंबंधी जनतेचा हार्दिक पाठिंबा मिळण्याचें अगत्य हिंदुस्थानांत तरी नव्यानें प्रतिपादन करण्याची आवश्यकता नाहीं.

## चलनवृद्धीवर हिंदी अर्थशास्त्रज्ञांची उपाययोजना

चलनवृद्धीवर उपाय–योजना सुचविण्यासाठी हिंद सरकारनें नऊ अर्थशास्त्रज्ञांना पाचारण केलें होतें. त्यांच्या कमिटीनें केलेल्या शिफारशी लक्षांत घेऊन प्रांतिक सरकारें व मध्यवर्ती सरकारचीं निरनिराळीं खातीं, ह्यांच्याशीं विचारविनिमय करण्यांत येत आहे.

कांहीं उद्योगपतींचेंही म्हणणें हिंदचें मंत्रिमंडळ पुढील कांहीं दिवसांत ऐकून घेणार आहे. त्यांच्याशीं विचारविनिमय झाल्यावर अर्थशास्त्रज्ञांच्या कमिटीला पुन्हा आवाहन करण्यांत येईल असा अंदाज आहे. प्रांतिक आणि मध्यवर्ती सरकारांपुढें मुख्य प्रश्न उत्पन्नाच्या आंत खर्च कसा बसवावा हा आहे. अर्थशास्त्रज्ञांच्या अहवालाचा सारांश अनाधिकृतपणें वृत्तपत्रांत आला आहे. त्यांच्या मतें, सरकारनें असें केलें नाहीं तर तें स्वतःच चलनवृद्धीला चालना देण्याच्या दोषाला पात्र होईल. किंमती वाढत चालल्या कीं पगार व वेतन वाढत जाणें अपरिहार्यच असतें. तेव्हां ग्राहकाला प्राथमिक गरजेच्या वस्तू योग्य त्या किंमतींना मिळवून देणें एवढाच मार्ग आहे. त्यासाठी अशा वस्तूंवर कडक नियंत्रणें घालणें जरूरच आहे.

सरकारनें विनियंत्रणाचें धोरण स्वीकारलें त्यावेळीं असें जाहीर केलें होतें कीं हें धोरण अयशस्वी झाल्यास, नियंत्रणें पुन्हां बसविण्यांत येतील. अर्थशास्त्रज्ञांनीं ह्या गोष्टीची सरकारला आठवण करून दिली आहे. आतां नियंत्रणें पुन्हा बसविण्याची वेळ आली असून तीं निष्फल करण्याचा प्रयत्न कांहीं हितसंबंधांकडून होईल अशी भीति अर्थशास्त्रज्ञांना वाटत आहे. हिंदुस्थानांतील श्रीमंत वर्ग सरकारचीं कर्जें पुरेशीं घेत नाहीं. तशी त्यांची वृत्ति दिसली तर तिला पायबंद घालण्याच्या योजनाही अर्थशास्त्रज्ञांच्या कमिटीनें सुचविल्या आहेत असें म्हणतात. उत्पन्नांतून बचत करण्याच्या योजनाही अधिक आकर्षक केल्या जाण्याचा संभव आहे.

विशेषतः कर चुकविणारांना पकडण्यासाठी जरूर त्या उपायांचा अवलंब करण्याचें सुचविण्यांत आलें आहे. अर्थशास्त्रज्ञांच्या मतें कर चुकविणारे लोक दरसाल १०० कोटी रुपयांची रक्कम देण्याचें टाळीत आहेत. ह्या रकमेपैकीं शक्य तितकी अधिक रक्कम वसूल करण्याच्या दृष्टीनें प्राप्तीवरील करवसुलीची चौकशी करणाऱ्या कमिशनला अधिक व्यापक अधिकार देण्याची शिफारस करण्यांत आली आहे. जे लोक अथवा बँका जरूर ती माहिती देण्याचें टाळतात, त्यांच्या बाबत अशा अधिकारांची विशेष गरज आहे.

---

**आसाममधील अफू**—आसाम प्रांतांतील जगांत सर्वांत अधिक प्रमाणांत अफूचें व्यसन लोकांत आढळून येतें, असें म्हणतात. सरकारनें ह्या व्यसनाविरुद्ध सुरू केलेल्या मोहिमेस चांगलें यश येत असून आसाममधून ह्या व्यसनाचें संपूर्ण उच्चाटन लवकरच होईल, असा अंदाज आहे.

**मुंबई ते लंडन रस्ता**—दक्षिण पॅलेस्टाइनमधील अकाबा ह्या शहरापासून सीरिआच्या सरहद्दीवरील मेटुलापर्यंत ७०० किलोमीटर लांबीचा रस्ता तयार करण्यासाठी प्राथमिक पहाणी चालूं झाली आहे. पॅलेस्टाइनच्या ज्यू राज्याचे मजूर मंत्री ह्यांनीं असें सांगितलें कीं वरील रस्ता म्हणजे सीलोनपासून मास्कोपर्यंत व मुंबईपासून लंडनपर्यंत मोठे मोटारींचे तयार रस्ते करण्याच्या योजनेचाच एक भाग आहे.

**हिंदी कोळशावरील अवलंबन दूर करण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न**—पाकिस्तान सरकार सिंधू नदीवर धरणें बांधून, वीज निर्माण करून, आपल्या रेल्वे विजेवर चालविण्याची योजना आखीत आहे. मि. रिचर्ड सॅव्हेज हा अमेरिकन तज्ज्ञ ह्याबाबत पहाणी करीत आहे. पाकिस्तानला कोळशासाठी हिंदुस्थानावर अवलंबून रहावें लागतें, म्हणून हा सर्व प्रयत्न आहे.

### जरूरीच्या वस्तूंवर नियंत्रण हवें.

मुंबई येथील ब्यूरो ऑफ कमर्शिअल इंटेलिजन्स अँड स्टॅटिस्टिक्स ह्या संस्थेनें वरील विषयावर मुंबईतील नागरिकांचीं मतें अजमावलीं. शेकडा ७० नागरिकांनीं कापड, अन्नधान्य व कोळसा ह्या वस्तूंवर नियंत्रण असावें असें आपलें मत व्यक्त केलें आहे. वाढलेल्या किंमती नियंत्रणाशिवाय कमी कशा कराव्या ह्याबद्दल सूचना मागविल्या असतां, बहुतेक जणांनीं पुढील दोन सूचना केल्या. अन्नधान्य, कापड व कोळसा ह्यांचें अधिक उत्पादन करावें, ह्या सूचनेला सगळ्यांत अधिक मतें पडलीं. त्याच्या खालोखाल योग्य किंमतीचीं दुकानें उघडा आणि काळ्या बाजाराला कडक शिक्षा ठेवा, ह्या सूचनेला मतें पडलीं. विचारलेले प्रश्न व त्यांना देण्यांत आलेल्या उत्तरांची टक्केवारी पुढें दिली आहे.

प्रश्न १—सरकारनें कापडाच्या किंमती नियंत्रित कराव्यात असें तुम्हांस वाटतें काय?

| होय | नको | मत नाहीं |
|---|---|---|
| ७१% | २५% | ४% |

प्रश्न २—अन्नधान्यांच्या किंमती सरकारनें नियंत्रित कराव्यात काय?

| होय | नको | मत नाहीं |
|---|---|---|
| ७८% | १८% | ४% |

प्रश्न ३—कोळशाची किंमत सरकारनें नियंत्रित करावी काय?

| होय | नको | मत नाहीं |
|---|---|---|
| ७४% | २१% | ५% |

किंमतींवर नियंत्रणें न बसवितां त्या खालीं आणण्यासाठीं काय करावें? असा प्रश्न विचारला असतां आलेल्या उत्तरांची छाननी पुढीलप्रमाणें आहे:—

| | |
|---|---|
| उत्पादन वाढ | २४ टक्के |
| कडक शिक्षा | २२ " |
| योग्य किंमतीचीं दुकानें | २० " |
| वहातुकीच्या सोईंत वाढ | १३ " |
| आयातींत वाढ | ९ " |
| इतर सूचना | १२ " |

ह्याशिवाय, जनतेला रहाणीचा खर्च कमी करण्याचें शिक्षण देणें, मूलभूत उद्योगधंदे राष्ट्रीय मालकीचे करणें आणि नव्या चलनी नोटा न काढणें, अशा सूचनाहि करण्यांत आल्या.

---

### परदेशीय प्रवाशांस प्रवासाची माहिती

ग्रेट ब्रिटनमध्यें परदेशीय प्रवासी येतात, त्यांच्या मार्गदर्शनार्थ चित्रपट दाखविण्याची व्यवस्था ब्रिटिश टूरिस्ट बोर्डानें केली आहे. ग्रेट ब्रिटनमधील आपल्या मुक्कामांत ज्या स्थळांना भेट द्यावयाची, त्यांची आगाऊ माहिती त्यामुळें प्रवाशांना मिळूं शकते. ह्या चित्रपटांच्या प्रती परदेशांतहि पाठविण्यांत येतात. सध्या सतरा देशांतून हे चित्रपट दाखविले जात आहेत. लंडन येथील केंद्रांत दररोज शेकडों प्रवाशांना दहा वेगवेगळ्या भाषांतून माहिती सांगितली जाते. चांगलीं हॉटेलें व उतरण्याच्या जागा ह्यांची माहितीहि तेथें मिळते.

---

**विमा कायदा समिति**—हिंदी विमा कायद्याची छाननी करून अभिप्राय व्यक्त करण्यासाठी हिंदुस्थानें सरकारनें एक समिति नेमली आहे. व्यापार खात्याचे जॉइंट सेक्रेटरी तिचे अध्यक्ष आहेत. सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स, कमिटीचे एक सभासद आहेत. बाकीचे सर्व सभासद विमा व्यवसायांतील आहेत.

## जलमार्ग व वहातूक

### नदी कालव्यांचा उपयोग

(श्री. न. ग. आपटे ह्यांचें मुंबई रेडिओवरील भाषण, केंद्राच्या अधिकाऱ्यांच्या कृपेनें उद्धृत केलें आहे.)

जलमार्ग व वहातूक ह्या विस्तृत विषयांपैकी जलमार्गावरील अथवा पाण्यांतील वहातुकीसाठी नद्या व कालवे यांचा उपयोग हिंदुस्थानांत व महाराष्ट्रांत किती होईल याबद्दल चार शब्द सांगावयाचे आहेत. पाण्यावरील वहातूक ही निसर्गतःच कमी खर्चाची व श्रमाची आहे. कोणताहि पदार्थ पाण्यांत टाकला कीं त्या पदार्थाचें वजन त्याच्या आकाराच्या पाण्याच्या वजनाइतकें कमी होतें हा आर्किमिडीस या प्रसिद्ध शास्त्रज्ञानें प्रस्थापित केलेला सिद्धांत सर्वांच्या परिचयाचा आहे. आपण पाण्यांत पोहत असतां आपणांस हलकें वाटतें किंवा एखादा पदार्थ पाण्यांत बुडविला असतां हलका वाटतो. याचें कारण त्या पदार्थामुळें जें पाणी बाजूस सारलें जातें त्या पाण्याच्या वजनाइतकें त्या पदार्थाचें वजन कमी होतें हें होय. या शास्त्रीय सत्यावरच नौकानयन आधारलेलें आहे. पदार्थाचें अथवा मालाचें वजन कमी झाल्यानें सहाजिकच त्याच्या वाहतुकीस कमी श्रम व खर्च येतो. पाण्याचा प्रवाह असला म्हणजे रेल्वेसारखे रूळ घालणें, मोठमोठे रस्ते करणें, ते नेहमीं दुरुस्त ठेवणें यासारखे खर्च करावे लागत नाहींत. या प्रश्नाच्या तात्त्विक विवेचनास फारसा वेळ नाहीं. परंतु पाण्यावरील वहातूक ही कमी श्रमाची व ओघानेंच कमी खर्चाची आहे एवढी गोष्ट वर दिलेल्या थोड्याशा सूचक माहितीवरून स्पष्टपणें ध्यानांत येण्याजोगी आहे.

नौकानयनाचा इतिहास फार जुना आहे. समुद्रावरील नौकानयन व नद्या आणि नद्यांचे कालवे त्याचप्रमाणें नद्यांच्या खाड्या व सरोवरें यांतील नौकानयन हीं समकालीनच आहेत. मनुष्याच्या स्वतःच्या सुखसोईसाठी कल्पकतेनें उपाय शोधण्याच्या प्रवृत्तीचेंच नौकानयन हें फळ आहे व या विषयाकडे मनुष्य जातीचें लक्ष फार पुरातन काळापासून वेधलेलें आहे. वैदिक वाङ्मयांतील आर्क्टिक भागांतील वस्तीची माहिती देणारे लो. टिळकांचे 'आर्क्टिक होम इन दी वेदाज' या जगन्मान्य निबंधांत नौकानयन त्यावेळीं चालू असल्याची माहिती आहे. थोडक्यांत म्हणजे नौकानयन अथवा पाण्यावरील वहातूक ही फार पुरातन काळापासून चालू आहे.

आपल्या देशापुरता व ऐतिहासिक काळापासूनचाच नदी व नद्यांचे कालवे व त्यांतील वहातुकी एवढ्या मर्यादित विषयाचा विचार करण्याचें ठरविलें तरी आपणास चौदाव्या शतकापर्यंत मागें जावें लागेल. त्यावेळीं फिरोज नांवाच्या दिल्लीच्या तक्तावरील एका बादशहानें अंतर्गत कालव्यांतून वहातूक करण्याची एक मोठी योजना आंखली होती. प्रथमतः सतलज व यमुना या दोन नद्या कालव्यानें जोडावयाच्या व त्यांतून वहातूक चालू करावयाची व नंतर सिंधू व गंगा यांतून ती वहातूक चालवावयाची. या प्रकारें वाट करीत करीत काबूलपासून कलकत्त्यापर्यंत बोटीची वहातूक करण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. या बादशहानें कांहीं प्रयत्न केला. त्यानंतरची समग्र माहिती उपलब्ध नाहीं.

प्रत्यक्ष वहातुकीबाबतच्या उल्लेखाचा विचार करतां सिंधू नदींतून अटकेपर्यंत सुमारें एक हजार मैलांची वहातूक होत असे. यमुनेतून कलकत्त्यापासून आग्र्यापर्यंत सुमारें एक हजार मैलांची वहातूक होत असे. चेनाब नदींतून वझिराबादपर्यंत आठशें मैल व सतलज नदींतून लुधियानापर्यंत आठशें मैल एवढे लांब पल्याच्या वहातुकीबाबतचे उल्लेख इतिहासांत उपलब्ध आहेत.

याप्रमाणें महत्त्वाच्या नद्यांतून सुमारें पांच हजार मैलांची वहातूक अंतर्गत जलप्रवाहांतून होत असे. या कामांत बऱ्याचशा बोटी व पडाव गुंतलेले असत. किंमतीचा विचार करितां त्यावेळीं ही केवळ सिंधू नदीच्या जलमार्गावरून सुमारें २॥ ते ३ कोटी रुपयांच्या मालाची नेआण होत असे व सक्कर येथून एक वर्षांत सुमारें तीन हजार बोटी वर-खाली जात असत व त्या सुमारें पंचेचाळीस हजार टन मालाची नेआण करीत असत. सिंधू नदीवरील हा व्यापार बुडण्याचीं जीं निरनिराळीं कारणें आहेत, त्यांत लोहमार्गाशीं या मार्गाची होणारी स्पर्धा हें कारण अग्रगण्य आहे. या एका जलमार्गाखेरीज इतर अनेक नद्यांतून या प्रकारची वहातूक होत असे.

सध्याच्या नदी-कालव्यांतील नौकानयनाचा आतां विचार करूं. गंगा, महानदी, गोदावरी व कृष्णा या पूर्व किनाऱ्यावर समुद्रास मिळणाऱ्या नद्या व तापी, नर्मदा, सिंधू या पश्चिम किनाऱ्यावर समुद्रास मिळणाऱ्या नद्यांतूनच महत्त्वाचें नौकानयन सध्यां चालू आहे. त्याच प्रमाणें मद्रास, आसाम व बंगाल या प्रांतांतून कालव्यांचें महत्त्वाचे असें नौकानयन चालू आहे. हें नौकानयन अथवा जलमार्गावरील वहातूक यांत्रिक सहाय्यानें व मनुष्याचे सहाय्यानें चालू आहे. आज वहातूक चालू असलेल्या प्रवाहांची एकंदर लांबी फक्त २५,००० मैलच आहे. यापैकी नद्यांतून होणारी वहातूक ही दहा हजार मैल लांबीची आहे. व कालव्यांतून होणारी वहातूक ही पंधरा हजार मैल लांबीची आहे. सध्यांचे कालवे हे मुख्यतः शेतीच्या पाणीपुरवठ्यासाठी बांधलेले असल्यानें व बोटीची वहातूक हा विषय डोळ्यापुढें नसल्यानें हे कालवे या वहातुकीस सर्वस्वीं उपयोगी आहेत असें नाहीं. इतकें असूनही या पंधरा हजार मैलांपैकी सुमारें चार हजार मैलांत यांत्रिक सहाय्यानें वहातूक चालू आहे. उरलेली अकरा हजार मैलांतील वहातूक ही माणसाचे सहाय्यानें चालू आहे. वरील माहिती १९४७ सालांतील आहे व ती माहिती हिंदुस्थान सरकारच्या सेन्ट्रल वॉटरवेज इरिगेशन व नॅव्हिगेशन कमिशननें पुरविली आहे.

या विषयाचा इतिहास पहातां परकी अमदानींत या महत्त्वाच्या व कमी खर्चाच्या वहातुकीची आबाळ झाली असल्याचें निदर्शनास येईल. सिंधू नदीवरील वहातूक रेल्वेपेक्षां कमी खर्चाची पडत असल्यानें व रेल्वेशीं दराबाबत स्पर्धा निर्माण झाल्यानें ती बंद पाडण्यांत आल्याचें उदाहरण मघा सांगितलें आहेच. याप्रमाणें अन्य ठिकाणींही होऊन ही वहातूक अवघ्या पंचवीस हजार मैलांवर आली आहे याचा नामनिर्देश करणें क्रमप्राप्त म्हणूनच केला आहे. (अपूर्ण)

### मध्यप्रांत सरकारचें कर्ज

रकम : २ कोटी रु.
किंमत : ९९%
केव्हां मिळेल : बुधवार, १ सप्टेंबर, १९४८
परत फेड : १ सप्टेंबर, १९६४
व्याजाचा दर : ३%
उद्देश : विद्युदुत्पादनासाठी भांडवली खर्च

### संयुक्त राष्ट्रसंघटनेचा खर्च

संयुक्त राष्ट्रसंघटनेचें १९४९ मधील खर्चाचें बजेट ३,३४,६९,५८७ डॉलर्सचें आहे. १९४८ चे मानानें ही रकम १३,५५,६०८ डॉलर्सनीं कमी आहे. काटकसरीमुळें ही बचत शक्य झाली आहे. जनरल असेंब्लीची बैठक न्यूयॉर्क येथें भरविण्यांत येण्याचा संभव आहे, त्यामुळेंच १० लक्ष डॉलर्स कमी लागणार आहेत.

## सहकारी कानूंत दुरुस्ती

### इन्स्टिटयूटच्या शिक्षणफंडास सोसायटयांची देणगी

४% किंवा त्यापेक्षा जास्त दरानें डिव्हिडंड देणाऱ्या प्रत्येक सहकारी सोसायटीनें प्रां. स. इन्स्टिटयूटच्या शिक्षण फंडास वर्गणी दिलीच पाहिजे, अशा अर्थाची दुरुस्ती मुंबई सरकारनें सहकारी कानूंत केली आहे. वर्गणीचा हिशेब खालीलप्रमाणें केला जाईल:—

| डिव्हिडंडचा दर | | वर्गणी |
|---|---|---|
| ४% | नफ्याच्या | १% |
| ५% पेक्षा अधिक नाहीं | " | १¼% |
| ६¼% पेक्षा अधिक नाहीं | " | १½% |

सोसायटीच्या डिव्हिडंडचा दर ६¼ पेक्षा जास्त असूंच शकत नाहीं. सोसायटीच्या नफ्याची रक्कम २०० रु. पेक्षा अधिक भरली नाहीं, तर तिनें इन्स्टिटयूटच्या शिक्षणफंडास वर्गणी देण्याचें कारण नाहीं.

## सहकारी संस्थांच्या नोकरवर्गाचें शिक्षण

### प्रां. सहकारी इन्स्टिटयूटची सोसायटयांना विनंति

सर जनार्दन मदन ह्यांच्या अध्यक्षतेखालील कमिटीनें केलेल्या शिफारसीप्रमाणें मुंबई सरकारनें सहकारी शिक्षणाचें काम मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटकडे सर्वस्वी सोपविलेलें आहे. इन्स्टिटयूटनें जून, १९४७ मध्यें पुणें येथें (१) सहकारी ट्रेनिंग कॉलेज व (२) पुणें, सुरत व धारवाड येथें ट्रेनिंग शाळा ह्यांची स्थापना केली. (१) सहकारी संस्थांतील वरच्या दर्जाचा नोकर वर्ग आणि (२) सेक्रेटरी वगैरेंच्या शिक्षणाची सोय त्यांत झाली आहे. हें कॉलेज व ह्या शाळा प्रांतांतील सहकारी संघटनेचा एक कायमचा भाग बनावा अशी इन्स्टिटयूटची इच्छा आहे; आणि प्रगतिप्रिय सहकारी संस्थांच्या सहकार्यानेंच तें शक्य होणार आहे. इन्स्टिटयूटच्या शिक्षण कार्यासाठी ह्यापुढें सोसायटयांनीं सक्तीनें वर्गणी द्यावी लागणार आहे. ह्या वर्गणीचा मोबदला मिळविण्याचा सोसायटयांनीं अवश्य प्रयत्न करावा व वरील शिक्षण संस्थांकडे सोसायटयांनीं आपले नोकर शिक्षणासाठीं पाठवावे. सर्वच नोकर एकदम शिकवून तयार करण्याची आवश्यकता नाहीं; कांहीं वर्षांचा कार्यक्रम आखून त्या मुदतींत सर्वांची व्यवस्था करतां येईल. त्यांना मिळणाऱ्या पद्धतशीर शिक्षणाचे मानानें त्याप्रीत्यर्थ येणारा खर्च (नोकरांचा पगार, भत्ता, इ.) हा फार वाटण्याचें कारण नाहीं. महत्त्वाच्या जागांवर असणाऱ्या नोकरांची यादी करून त्यांपैकीं किती जणांनीं सहकारी शिक्षण घेतलेलें आहे हें पहावें आणि बाकीच्यांना सहकारी शिक्षण देण्याचें ठरवावें. त्यांपैकीं सहकारी कॉलेजांत कोणाला पाठवावयाचें व शाळेंत कोणाला घाडावयाचें हें निश्चित करावें आणि संस्थेच्या आर्थिक सामर्थ्यास व नोकरवर्गाच्या संख्येस अनुसरून त्यांच्या शिक्षणाचा तीन, चार किंवा पांच वर्षांचा कार्यक्रम आखावा.

### विटा मर्चंटस को. बँक लि.

१९४७–४८ मध्यें बँकेचें शेअर भांडवल १८½ हजारांनीं वाढून तें ७०,९०० रु. झालें. गंगाजळी, ठेवी, कर्ज येणें, मिळालेलें व्याज ह्या सर्व बाबतींत अहवालाचे वर्षीं चांगली प्रगति झाली आहे. विटें व मायणी येथील सहकारी सोसायटयांना त्यांच्या रकमा ह्या बँकेंत ठेव म्हणून ठेवण्यास परवानगी मिळाली आहे. थकबाकी फक्त ८०५ रु. आहे व तीहि एक वर्षाचे आंतीलच आहे. ५ लक्ष, ९८ हजारांच्या खेळत्या भांडवलावर ११,२०५ रु. निवळ नफा झाला. त्यांतूनच इमारत व कर्जबुडफंडाकडे ३,४०० रु. ची तरतुद केली आहे व सरकारी रोख्यांच्या विक्रीवरील नफ्याची रक्कम नफ्यांत न धरतां इ. फ. फंडाकडे घेतली आहे. ६¼% डिव्हिडंडला ४,३६८ रु. लागले.

## जाहीर विनंती

### प. खानदेश एक्स–सर्व्हिसमेन्स को–आपरेटिव्ह ट्रान्सपोर्ट असोसिएशन, लि., धुळें

ही संस्था सन १९२५ सालच्या मुंबई सहकारी सोसायट्यांचा कायदा ७ अन्वयें स्थापन होऊन एक वर्ष होत आलें आहे. या अल्पावधींत संस्थेनें बरीच कामगिरी केलेली आहे. गतवर्षी संस्थेनें मुख्यत: सरकारी धान्य वहातुकीचें काम हातीं घेतलें होतें व चालू वर्षी पण हें काम घेणार आहे.

### सरकारी देखरेख

ही संस्था खास सरकारच्या देखरेखीखाली चालली आहे. मे. कलेक्टर पश्चिम खानदेश, धुळें, हे या संस्थेचे अध्यक्ष असून संस्थेचे सेक्रेटरी म्हणून सरकारी अधिकाऱ्याची नेमणूक झाली आहे. संस्थेची तपासणी सरकारी ऑडिटरकडून दरवर्षी होते.

### ठेवी घेतल्या जातात

ज्यांना ठेव टेवावयाची आहे, त्यांनीं या संस्थेचा अवश्य फायदा घ्यावा. खालील अटीवर कायम ठेवी स्वीकारल्या जातील:—

| रक्कम | मुदत | व्याजाचा दर |
|---|---|---|
| रु. ५०/- व त्याची पट | १ ते २ वर्षे | २½% |
| " | ३ ते ५ " | ३½% |

### सभासद व्हा

त्याचप्रमाणें सैन्यांतून सेवानिवृत्त झालेले पण मोटार ड्रायव्हिंग व मोटार मेकॅनिक्स कोर्सचें संपूर्ण ज्ञान मिळविलेले पश्चिम खानदेश जिल्ह्यांतील रहिवाशांना या संस्थेचे सभासद होतां येईल. प्रत्येक शेअरची किंमत रु. १००/- असून प्रवेश फी रु. ५/- आहे. अर्जासोबत ही रक्कम संस्थेमध्यें भरणा करावयाची असते. तरी ज्यांना सभासद होणेचें आहे त्यांनीं वरील प्रमाणें रक्कम खालील पत्त्यावर मनिऑर्डरनें पाठवावी अगर समक्ष भरावी.

ह्या संस्थेच्या मार्फत मालाची वहातूक योग्य मोबदल्यानें केली जाते. तरी गरजूंनीं या सुसंधीचा अवश्य फायदा घ्यावा.

विशेष माहितीकरितां लिहा अगर भेटा.

### दि मागोरा केमिकल कं. लि. चें पहिलें डिव्हिडंड

मागोरा कंपनीची चवथी सर्वसाधारण सभा ता. १४ ऑगस्ट रोजीं भरली होती. तिनें डायरेक्टरांचा अहवाल व ताळेबंद मंजूर करून डिव्हिडंड जाहीर केलें. ३१–१२–४७ अखेरच्या १४ महिन्यांत कंपनीस ६,४४४ रु. नफा झाला. ह्या १४ महिन्यांत एकूण १,७०,००० रु. ची विक्री झाली. त्यापूर्वीच्या १२ महिन्यांतील विक्रीचा आकडा १,१४,००० रु. होता. ह्यावरून कंपनीच्या कारभारांतील सुधारणेची कल्पना येईल. कंपनीच्या स्थापनेनंतर नफा दाखविणारें हें पहिलेंच वर्ष आहे. कंपनीचीं कित्येक नवीं पेटंट औषधें बाजारांत चांगलीं खपूं लागलीं आहेत. ह्या सर्व प्रगतीबद्दल कंपनीचें व तिचे मॅनेजिंग एजंट आर. वाय. रानडे आणि कं. चें अभिनंदन करणें आवश्यक आहे.

हिंदी पार्लमेंटांत

## आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

२०जून, १९४८ रोजीं पुऱ्या झालेल्या वर्षांत हिंदी सरकारच्या मालकीच्या पांच रेल्वेजवर मिळून लांचलुचपत व नियमबाह्य वर्तन ह्याबाबत १८६ तक्रारी नोंदविण्यांत आल्या. ह्या तक्रारींपैकी ४३ तक्रारीबाबत खटले भरण्यांत आले अगर खात्यातर्फे त्यांची विल्हेवाट लावण्यांत आली. ४६ तक्रारींबाबत अद्याप चौकशी चालू आहे. ९७ तक्रारींबद्दल चौकशी करण्यांत येऊन पुरेशा पुराव्याच्या अभावीं त्या रद्द करण्यांत आल्या.

× × ×

हिंदी सरकारनें 'तयार' घरें बांधणाऱ्या एका ब्रिटिश कंपनीशीं १२ वर्षे मुदतीचा करार केला आहे. ह्या करारान्वयें हिंदुस्थानांत 'तयार' घरें बांधण्याचा एक कारखाना काढावयाचा असून दरवर्षी ५ हजार 'तयार' घरें उभारावयाचीं आहेत. अजून कारखान्याची जागा ठरलेली नाहीं. कारखाना उभारण्याला सुमारें २० लाख रुपये खर्च येईल. प्रत्येक तयार घराला २,५०० रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. ह्या घरांत ९ फूट रुंद व १० फूट लांब अशा दोन खोल्या, व्हरांडा व स्वयंपाकघर इतक्या जागेचा समावेश होईल. घरांसाठी अल्युमिनियमच फक्त लागेल; सिमेंट व पोलाद ह्यांची जरूर भासणार नाहीं. हा कारखाना उभारल्यानंतर देशाच्या इतर भागांतहि अधिक कारखाने उभारण्याचा सरकार विचार करील.

---

### मुंबई प्रांतिक सहकारी बँक लि.

(वार्षिक सभा: ४-९-४८)

(१) अहवालाचे वर्षी बँकेचें खेळतें भांडवल ७ कोटी, १२ लक्ष रु. वरून ८ कोटी, ९७ लक्ष रुपयांवर गेलें.

(२) ठेवींच्या रकमेंत १ कोटी, ९२ लक्ष रुपयांची वाढ झाली तरी सर्व प्रकारच्या कर्जांची रक्कम २० लाखांनीं घटली. सहकारी संस्थांच्या सभासदांना ऋणविमोचन कायद्यान्वयें पीक उभारण्यासाठी दिलेल्या कर्जाची रक्कम मात्र ९ लाखांनीं वाढली. त्याचप्रमाणें, मालतारणावरील कर्जे ६८ लाखांचीं ९८ लाखांवर गेलीं.

(३) ऋणविमोचन कायद्याचे कक्षेंतील कुळांना कर्जपुरवठा करण्यासाठी उघडाव्या लागणाऱ्या शाखांना, त्या तोट्यांत आल्यास, प्रथमचीं कांहीं वर्षे नुकसान भरपाई देण्याचें आश्वासन सरकारनें दिलें आहे.

(४) बँकेचें खेळतें भांडवल फुगलें तरी कर्जाऊ दिलेल्या रकमांत प्रमाणबद्ध वाढ होऊं शकली नाहीं. उरलेली रक्कम रोख्यांत गुंतवावी लागली, तिचा आकडा ३ कोटी, ५९ लक्ष रुपयांवरून ५ कोटी, ८ लक्ष रुपयांचे घरांत गेला.

(५) बँकेस अहवालाचे वर्षी निव्वळ नफा ३,८९,३३७ रु. झाला. ४% डिव्हिडंड + १% बोनस ह्यांस १,०१,५८५ रु. लागतील. रिझर्व्ह फंडांत ९७,६३६ रु. टाकल्यावर तो ८ लक्ष, ११ हजार रु. होईल.

(चेअरमन: श्री· आर. जी. सरय्या; ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर: श्री. व्ही. पी. वर्दे)

---


# वि ज य
# टेक्स्टाइल्स लि.
—येरंडवणा, पुणें ४—

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगीण प्रगति आमच्या भागीदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.

मॅनेजिंग एजंट्स.

# दि बॉंबे प्रॉव्हिन्शिअल को. बँक लि.

हेड ऑफिसः—९, बेक हाऊस लेन, कोट, मुंबई
स्थापना : १९११
चेअरमन:—श्री. रमणलाल जी. सरय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल ... ... | २०,३३,००० रु. |
| गंगाजळी ... ... | २७,१२,००० रु. |
| एकूण ठेवी ... ... | ६,४१,३४,००० रु. |
| खेळतें भांडवल ... ... | ७,७७,३३,००० रु. |

११ जिल्ह्यांत मिळून ५१ शाखा.

मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली बँक.

★ हिंदुस्थानांतील महत्त्वाच्या कित्येक शहरांतील बँकांशीं वसुलीची व्यवस्था केली आहे.

★ वेगवेगळ्या प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

—अटीसाठी चौकशी करावी—

वा. पुं. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

## सीलोन व इंग्लंड यांमधील स्टर्लिंग कर्जाबद्दल करार

सीलोनचें इंग्लंडकडे जमा असलेलें स्टर्लिंग कर्ज १ मे, १९४८ रोजीं ५,१०,००,००० पौंड होतें. ह्या कर्जाच्या परतफेडीबद्दल उभयतां सरकारांमध्यें नुकताच १९४८ अखेरपर्यंत मुदतीचा करार करण्यांत आला आहे. ह्या करारान्वयें ४० लक्ष पौंड रक्कम १९४८ अखेरपर्यंत सीलोनला इंग्लंडकडून मिळेल. कांहीं विशिष्ट परिस्थितींत ही रक्कम १० लक्ष पौंडांनीं वाढविण्यांत येईल. नंतर १९४९ मध्यें दीर्घ मुदतीचा करार केला जाईल. सीलोनची अर्थव्यवस्था मजबूत पायावर स्थिर करण्यासाठीं इंग्लंडनें मदत करावी, व इंग्लंडनें आंतरराष्ट्रीय चलननिधि व आंतरराष्ट्रीय पुनर्घटना बँक ह्यांचें सदस्यत्व सीलोनला मिळवून देण्याचे कामीं मदत करावी, असें ठरलें आहे. सीलोनला १९४८ अखेर १८ कोटी रु. किंमतीचे अमेरिकन व कॅनेडियन डॉलर्स व्यापारामुळें उपलब्ध होतील, परंतु सीलोनचा डॉलर्सचा खर्च १० कोटी रु. च राहील असा अंदाज आहे. इंग्रज लोकांचें सीलोनमध्यें गुंतलेलें भांडवल इंग्लंडकडे येणें असलेल्या स्टर्लिंग कर्जाच्या रकमेहून थोडें जास्तच आहे. पुनर्घटनेसाठीं इंग्लंडची मदत सीलोनला पाहिजे आहे. सीलोनच्या आयातपैकीं निम्मा ते दोन-तृतीयांश खर्च अन्नधान्य इ. च्या आयातीवर त्याला खर्च करावा लागतो. सीलोननें स्टर्लिंगांतील देशांची हुंडणावळीची परिस्थिति सुधारण्यास इंग्लंडला मदत करावयाची आहे.

सीलोन स्वतंत्र झाला असला तरी तें एक लहान राष्ट्र आहे, व सीलोनची औद्योगिक वाढ व्हावयाला फारसा अवसर नाहीं. रबर, चहा व नारळ ह्या तीन धंद्यांवर सीलोनची अर्थव्यवस्था अवलंबून आहे. यापैकीं रबर व चहा हे धंदे परकीयांच्या ताब्यांत आहेत. ह्या धंद्यांची मालकी जेव्हां सीलोनी लोकांच्या हातीं येईल त्यावेळीं तेथील परिस्थिति आर्थिक दृष्ट्या सुधारेल. शिवाय हे तीनहि धंदे असे आहेत कीं इतर देशांची ह्या पदार्थांच्या उत्पादनाच्या बाबतींत स्पर्धा आहे. रबराच्या नवीन लागवडीमुळें व कृत्रिम रबराच्या वाढत्या उपयोगानें, कदाचित् नैसर्गिक रबराच्या धंद्याचें आजचें महत्त्व टिकणार नाहीं. नारळाचेंहि इतर देशांतील उत्पादन वर्धिष्णु आहे. फक्त चहाच्या बाबतींत मात्र स्थिति बरीच समाधानकारक आहे. कारण, चहाचा जागतिक खप वाढत जाईल व त्या मानानें उत्पादन बरेंच मर्यादित राहील. सीलोनला पक्का माल, चैनीचे पदार्थ, यंत्रसामुग्री व अन्नधान्य ह्यांसाठीं परदेशांवर अवलंबून रहावें लागतें. मळ्यामध्यें काम करणाऱ्या मजुरांचाहि तेथें तुटवडा आहे. ह्या सर्व कारणांमुळें स्वतंत्र सीलोनच्या अर्थव्यवस्थेला बरेंच कमकुवत स्वरूप प्राप्त झालें आहे, व ह्या परिस्थितीचें प्रतिबिंब इंग्लंडनें सीलोनशीं केलेल्या स्टर्लिंग कर्जाच्या परतफेडीबद्दलच्या करारांत दिसून येतें. सर्व उद्योगधंद्यांची मालकी सीलोनी जनतेच्या हातीं येईल व कांहीं किरकोळ कारखाने सीलोनमध्यें निघतील त्यावेळीं ही परिस्थिति बदलूं शकेल.

**पोलादाच्या कारखान्यांची जागा**—हिंदुस्थानांत लोखंडाचे व पोलादाचे दोन कारखाने उभारण्याचें हिंद सरकारनें ठरविलें आहे. कारखान्यांच्या उभारणीसाठीं सरकारनें तीन अमेरिकन तज्ज्ञांचा सल्ला घेतला आहे. ह्या तज्ज्ञांनीं मद्रास सरकारच्या अधिकाऱ्यांशीं कारखान्यांच्या जागांबद्दल नुकतीच चर्चा केली. सांडूर (बेल्लारी जिल्हा) आणि सालेम येथील लोखंडाच्या मातीचा उपयोग करून दक्षिण हिंदुस्थानांत एक कारखाना उभारण्य संबंधीं वाटाघाटी झाल्या, असें कळतें.





**शेतकरी कर्जनिवारण कायदा**
कापडी किं. ४॥ रु. कागदी किं. ४ रु.

| | |
|---|---|
| नवीन भाडें नियंत्रण कायदा | किं. २ रु. |
| मुंबई सावकारी कायदा | किं. २॥ रु. |
| कूळ कायदा, आवृत्ति ३ री | किं. ३ रु. |
| द्विभार्या प्रतिबंधक कायदा | किं. १ रु. |
| हिंदु घटस्फोट कायदा | किं. १ रु. |

हीं सर्व पुस्तकें आजतागायतच्या दुरुस्त्यांसह असून त्यांत अद्ययावत् न्यायालयीन निर्णय, चिकित्सक व सविस्तर टीपा व मूळ इंग्रजी टेक्स्ट आहेत. हीं पुस्तकें पुण्याच्या व्यवसायी वकिलांनीं तयार केलीं आहेत.

पत्ता— लॉ अॅकॅडमी, ७१० सदाशिव पुणें २.

**दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.**
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.








३४७ पुणें, ५८ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत ग. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व प्र. ग. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास,' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.